श्री राम चंद्र मिशन®

# इंडिया न्युजलेटर

मार्च २००८ | खाजगी वितरणाकरिता | खंड १ अंक २

प्रिय बंधू भगिनींनो,

प्रणाम.

इंडिया न्युजलेटरच्या पहिल्या अंकाला मिळालेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल धन्यवाद. कृपया तुमच्या सूचना व या बद्दलचा अहवाल जरूर पाठवा कारण न्युजलेटरचा दर्जा सुधारण्यासाठी त्या महत्वाच्या आहेत. गुरुदेवांची हैद्राबाद भेट, बसंतोत्सव व कोलकता आश्रमाची माहिती ही काही या अंकाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

मे च्या अंकासाठी बातम्या पाठविण्याची शेवटची तारीख १५ एप्रिल २००८ असेल. कृपया तुमची बातमी व त्या प्रसंगाचा एखादा फोटो तुमच्या झोनल इन्चार्जमार्फत पाठवा.

आदरपूर्वक,
संपादकीय मंडळ.

## चेन्नई येथील पोंगल उत्सव.



पोंगल हा एक महत्वाचा दाक्षिणात्य सण असून शेतातील पिके काढण्याच्या काळात हा पारंपारिक पध्दतीने साजरा केला जातो. धनधान्यामुळे झालेली भरभराट साजरी करणे म्हणजे हा सण होय. या कालावधीत गुरुदेव चेन्नई येथे वास्तव्यास असणारच या विचारापोटी संपूर्ण देशभरातून या पोंगल उत्सवासाठी अभ्यासी आले होते.

पोंगलच्या एक दिवस आधी पू. गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगानंतर दोन ऑडीयो सी.डी. चे प्रकाशन केले.

पोंगल दिनी सकाळचा सत्संग गुरुदेवांनी घेतला तेव्हा चार हजारापेक्षा जास्त अभ्यासींनी या उत्सवात सहभाग नोंदविला होता. संध्याकाळी बंधू शशांक यांचा बासरी वादनाचा कार्यक्रम झाला. पू. गुरुदेवांनी या कार्यक्रमाचा भरपूर आनंद घेतला.

## पूज्य गुरुदेव हैद्राबादमध्ये.



पोंगल उत्सव पार पडल्यानंतर गुरुदेव कोलकता व हैद्राबादच्या छोट्या दौऱ्यावर निघाले. जानेवारी १८ ते २५ या दरम्यान त्यानी कोलकत्याला व २५ ते २८ या कालावधीत हैद्राबादला भेट दिली.

हैद्राबाद येथे उतरताच गुरुदेव थेट थुमकुंटा आश्रमाकडे गेले. तेथे हजारोच्या संख्येने जमलेल्या अभ्यासींनी गुरुदेवांचे स्वागत केले. रविवार दि.२७च्या सकाळच्या सत्संगानंतर गुरुदेवांनी चार विवाह संपन्न केले व 'चिल्ड्रन सेंटर'ची कोनशिला बसविली. तेथे उपस्थित मुलांशी बोलताना गुरुदेवांनी त्यांना चांगला अभ्यास करण्याचा, सत्यवादी बनण्याचा, आज्ञाधारकपणाचा व सर्वांशी प्रेमळ व्यवहार करण्याचा उपदेश केला.





पू. गुरुदेव अत्यंत स्वस्थ व आनंदी दिसत होते. दररोज एक तास त्यांच्या कॉटेजच्या बाहेर अभ्यासींच्या सोबत बसून सहजमार्ग साधनेच्या महत्वाच्या पैलूंचे स्पष्टीकरण देत होते. गुरुदेवांच्या या बहुप्रतिक्षित हैद्राबाद भेटी दरम्यान एकूण ७५०० पेक्षा जास्त अभ्यासींनी सहभाग नोंदविला.



पू. गुरुदेव, २८च्या संध्याकाळी हैद्राबादहून मणपक्कम येथील बाबूजी मेमोरियल आश्रमात परतले.

## चेन्नई येथील बसंतोत्सव.

आदी गुरू पू. लालाजी महाराजांच्या जयंतीचा मुख्य कार्यक्रम चेन्नई येथे साजरा झाला. त्याप्रित्यर्थ गुरुदेवांनी सकाळचा सत्संग घेऊन त्यानंतर बारा विवाह संपन्न केले. जवळपास साडेतीन हजार अभ्यासी सहभागी झाले होते. या दिवशी वसंतपंचमीचा सकाळचा सत्संग गुरुदेवांनी घेतला तेव्हा त्यांच्या सानिध्यात राहण्यासाठी चार हजारापेक्षा जास्त अभ्यासींनी सहभाग नोंदविला होता. संध्याकाळचा सत्संग बंधू अजय भट्टर यांनी घेतला. संध्याकाळी भगिनी प्रियंका रमण यांचा कर्नाटकी गायनाचा कार्यक्रम झाला.




पू. गुरुदेवांनी 'स्पायडर्स वेब भाग ३' या पुस्तकाच्या कन्नड भाषांतराचे विमोचन केले. या प्रसंगी, या पुस्तकाच्या तिन्ही भागांच्या भाषांतराचे काम मिळाल्याचे भाग्य लाभल्याबद्दल, बंधू वाय. के. विश्वनाथ यानी कृतज्ञता व्यक्त केली.

## सतखोल २००८ – उन्हाळी बॅच.

सतखोलचे उन्हाळी बॅचसाठीचे (बॅच क्र. २२० ते २३१) अर्ज आता ऑनलाईन उपलब्ध असल्याचे कळविण्यास आम्हास आनंद होत आहे. संकेत स्थळ –
http://www.srcm.info/satkhol/satkhol_home.htm

दिलेल्या बॅच व्यतिरिक्त इतर कालावधीच्या बॅचसाठी अर्ज करता येणार नाही याची नोंद घ्यावी. अर्जाची छानणी ते जसे येतील त्या क्रमाने केली जाईल. तुम्हाला इंटरनेटची सोय उपलब्ध नसेल तर तुमच्या केंद्रप्रमुखांशी संपर्क साधा.

अर्ज भरण्यापूर्वी कृपया सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून घ्या.

ज्यांच्याकडे इंटरनेट सुविधा नाही त्यानी मदतीसाठी केंद्रप्रमुखांना भेटावे, तसेच सतखोल प्रशासकीय कार्यालयाशीपण संपर्क करता येईल. त्यांचा दूरध्वनी क्र. +९१ ४४२२५२१०९९ किंवा +९१ ४४ ४२१७ ११११, एक्स्टेन्शन २१८ असा आहे. संपर्काच्या वेळा – सकाळी १० ते दुपारी १२ किंवा दु ३ ते ४:३०.

## ‘ही, द हुक्का अँड आय’

अनेक अभ्यासींच्या विनंतीवरुन पू. गुरुदेवांनी डीव्हीडीच्या आणखी प्रकाशनासाठी अनुमती दिली आहे व त्याची कार्यवाही सुरु आहे. नवीन स्टॉक उपलब्ध होताच वितरण सुरु होईल.

ज्या अभ्यासींना या विशेष प्रकाशनासाठी नोंद करावयाची आहे ते स्थानिक केंद्रप्रतिनिधींशी संपर्क साधू शकतात.

तुम्हाला आणखी काही माहिती हवी असल्यास खालील संकेत स्थळावर ई–मेल करा.
whq.publications@srcm.org

## ‘ही, द हुक्का अँड आय’ ची कन्नड आवृत्ती

‘ही, द हुक्का अँड आय’ चे कन्नड भाषांतर करुन पुस्तकाच्या रूपात प्रकाशित करण्याचे ठरले आहे, जेणेकरुन कन्नड वाचक अभ्यासींना त्याचा लाभ होईल. हे एक विशेष प्रकाशन असल्यामुळे व एकदाच प्रकाशित होणार असल्यामुळे त्याचे आजीव सभासदांना वितरण होणार नाही. हे पुस्तक पू. गुरुदेवांच्या २४ जुलै २००८ च्या वाढदिवस कार्यक्रमात प्रकाशित होईल.

या पुस्तकाची किंमत रु २०० ठेवण्यात आली आहे व त्याची नोंदणी ३० एप्रिल २००८ पर्यंत करावयाची आहे. १ मे नंतर पैसे भरणाऱ्यांसाठी या पुस्तकाची किंमत रु ३०० राहील.

## पू. गुरुदेवांचा ८१ वा वाढदिवस कार्यक्रम

लखनौ, उ.प्र., भारत, २३, २४, २५ जुलै २००८.

आपल्या पू. गुरुदेवांच्या ८१व्या वाढदिवसाचा हा संस्मरणीय असा आनंदमय व शुभ सोहळा आणखी एकदा साजरा करण्यासाठी लखनौ शहरामध्ये एकत्र जमण्याचे व सदगुरुंच्या दैवी तसेच भौतिक प्रभेमध्ये बुडून जाण्याचे भाग्य आम्हा सर्वांना लाभत आहे.

त्यांच्या दैवी उपस्थितीत न्हाऊन निघण्याची ही विलक्षण संधी दिल्याबद्दल उत्सव कमिटी जगभरातील अभ्यासींच्या वतीने आपल्या प्रिय गुरुदेवांचे आभार मानते व आमच्यापैकी मोठ्या संख्येने अभ्यासी या उत्सवात सहभागी होतील अशी अपेक्षा करते.

श्री राम चंद्र मिशन (एस आर सी एम) व सहजमार्ग स्पिरिच्युॲलिटी फाऊन्डेशन (एस एम एस एफ) च्या संयुक्त विद्यमाने हा उत्सव साजरा होणार आहे. सदगुंरूच्या प्रेमाचा व कृपेचा प्रसाद या दिव्य उत्सवामध्ये सहभागी होऊन घेण्यासाठी सर्व अभ्यासी बंधू भगिनींना निमंत्रित करण्यात येत आहे.

आपले स्नेहांकित,
उत्सव कमिटी सदस्य.

कृपया आपल्या स्थानिक प्रशिक्षकांना किंवा केंद्राला भेटून या उत्सवाची सविस्तर माहिती घ्यावी. या उत्सवाची माहिती, अर्ज व सविस्तर परिपत्रक मिशनच्या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे.
Http://www.srcm.org/members/24july2008/index.jsp

## नवीन एम पी 3 सीडी प्रकाशित.





खालील एम पी 3 सी.डी.चे नुकतेच प्रकाशन झालेले असून ऑडियो व्हिडियो आजीव सभासदांसाठी त्यांच्या केंद्रांच्यामार्फत वितरणासाठी उपलब्ध आहेत.

या सी डी बाबूजी मेमोरियल आश्रम मणपक्कमस्थित बुकस्टोअर मध्ये विक्रीसाठी उपलब्ध असून केंद्राच्या मार्फतही उपलब्ध आहेत.

1. **Collected Talks of the Masters**, MP3 Series - Volume 5 1989
   Continuation of the chronological series of talks given by Shri. P. Rajagopalachari. Contains twenty-seven talks given by Master during 1989 in India and on his visits to Europe and USA.
2. **HeartSpeak 2005**
   Contains twenty-two talks given by Master during 2005 in India, and on his visits to UAE and Denmark.

## Constant Remembrance January 2008




कॉन्स्टन्ट रिमेंब्रन्स २००८चा पहिला अंक नुकताच प्रकाशित झालेला असून सभासदांना वितरीत होत आहे.

## नेवेली येथील 'ओपन हाऊस'




नेवेली लिग्नाईट कार्पोरेशन (NLC) हे कोळशाच्या खाणीपासून मोठ्या प्रमाणात तामिळनाडू राज्याला लागणाऱ्या विजेची निर्मिती करते. नेवेली हे शहर एन एल सी मध्ये काम करणाऱ्या १८००० कर्मचाऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबांच्या क्वार्टर्समुळे वसले गेले आहे. या शहरातील जीवनमान संथ असल्यामुळे येथील लोक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होऊ शकतात. त्यामुळेच गेल्या दोन वर्षात येथील धार्मिक व आध्यात्मिक चळवळीमध्ये वाढ झाली आहे.

नेवेली येथील श्री रामचंद्र मिशनचे केंद्र एका शाळेत दर रविवारी सत्संग चालविते ज्यामध्ये अंदाजे पन्नास अभ्यासी भाग घेतात. रविवार दि. २६ जानेवारी २००८ रोजी तेलगू समिती येथे एका ओपन हाऊसचे आयोजन करण्यात आले. तेथील अभ्यासींनी त्यांच्या नातेवाईकांना व मित्रांना आमंत्रित केले होते.

बंधू सी राजगोपालन यांनी तमिळमध्ये पन्नास मिनिटे सहजमार्गाबद्दल, त्याच्या वैशिष्ट्यांबद्दल जसे शुध्दीकरण, प्राणाहुती आणि विद्यमान सदगुरूंचे सहाय्य व त्याची परिणामकारकता यावर प्रकाश टाकला. श्रोत्यांनी विचारलेले प्रश्न हे त्यांच्या जीवनात सहजमार्गाला स्थापित करण्याच्या संदर्भातील थेट प्रश्न होते. या वरून हे सत्र त्यांनी किती लक्षपूर्वक ऐकले होते ते दिसून आले. प्रश्नांना उत्तरे देण्यामधील संयम, ठामपणा तसेच आकलनाची गहनता आणि प्रश्नांना उत्तरे देण्याचा अनुभव लक्षणीय होता, त्यामुळे वक्त्याबद्दलची आपुलकी आणखी वाढत गेली व श्रोते या विषयाच्या जास्त खोलात गेले. साठ श्रोत्यांपैकी चाळीस जणांनी त्या संध्याकाळीच साधनेला सुरवात केली. ही एक उल्हासित करणारी गोष्ट होती की श्रोते जेवणासाठी आपापल्या घरी गेले होते परंतु प्रत्येकजण पहिले सिटींग घेण्यासाठी पुन्हा परत आला व रात्री उशीरापर्यंत आपला नंबर लागण्याची वाट पहात होता. कोळसाखाणीच्या या शहरातील या व्यवस्थितपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमात मिळालेल्या सुखद प्रतिसादामधून आपल्या आशेला पल्लवित केले की असंख्य मानवी हृदये हिऱ्याप्रमाणे चकाकण्यासाठी आतूर आहेत.

श्रीराम राघवेंद्रन, चेन्नई.

## दीर्घ कालावधीचा (व्ही बी एस ई) मूल्याधारित शिक्षण उपक्रम

### एअर फोर्स स्कूल बेंगलोर (2006-2008)

अनेक शाळांमध्ये एका दिवसाची मूल्याधारित शिक्षण उपक्रमाची कार्यशाळा घेतल्यानंतर बेंगलोर येथील व्ही बी एस ई टीमने दीर्घ कालावधीच्या उपक्रमाची आखणी करण्यास सुरवात केली. या मधून शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग वाढीस लागला.

एअर फोर्स स्कूल (ए एस टि ई) बेंगलोर येथील एका इंग्रजी शिक्षक अभ्यासीच्या पुढाकाराने २००६ मध्ये त्या शाळेत व्हीबीएसई उपक्रम सुरु झाला. सुरवातीच्या ओळख सत्राच्या उपक्रमानंतर व पुढील पाठपुराव्यानंतर या उपक्रमाची सुरवात प्राथमिकच्या ३री ते ५वी इयत्तेसाठी २००६-२००७च्या शैक्षणिक वर्षामध्ये झाली. तीन ते चार महिन्यासाठी हे सत्र स्वयंसेवक सांभाळतील व त्यानंतर हा व्ही.बी.एस.ई उपक्रम वर्गशिक्षकांकडे पुढे चालू ठेवण्यासाठी हस्तांतरीत केला जाईल अशी योजना आखली गेली. स्मृती (SMRTI) प्रकाशित व्ही.बी.एस.ई मार्गदर्शक पुस्तकाचा संदर्भासाठी उपयोग केला व प्रत्येक वर्गासाठी एक व्ही.बी.एस.ई स्वयंसेवक नेमेला गेला, वर्गशिक्षक हे निरिक्षकाचे काम करीत असत.

अनेक प्रकारच्या उपक्रमांमधून व चित्रांमधून हे सत्र चित्तवेधक केले गेले. मुलांना त्यांचे विचार मांडण्यासाठी दिलेल्या संधीमुळे त्यांनी या सत्रांचा भरभरून आनंद घेतला. चार महिन्याच्या कालावधीनंतर या सत्रांचा समारोप या विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मूल्याधारित विज्ञान प्रदर्शनाने ( Value based science exhibition) झाला. या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांसमोर व शिक्षकांसमोर बरेच विषय मांडले. पुढच्या वर्षी म्हणजे २००७-०८च्या शैक्षणिक वर्षात हाच मूल्याधारित शिक्षण उपक्रम इयत्ता सहावी ते दहावीच्या वर्गासांठी तीन महिने घेतला. प्रत्येक वर्गासाठी एक व्ही.बी.एस.ई स्वयंसेवक होता. वर्गशिक्षकाने निरिक्षकाचे काम केले. या वेळी काही सत्रानंतर स्वयंसेवकांसोबत वर्गशिक्षकांना पण सत्र घेण्यास सांगण्यात आले. त्यामुळे ते पण प्रशिक्षित झाले. अनेक प्रकारच्या उपक्रमामधून विद्यार्थ्यांशी केलेली खुली चर्चा हे या सत्रांमधील खास वैशिष्ट्य होते.





शैक्षणिक वर्षाच्या शेवटी फक्त पालकांच्यासाठी एक सत्र आयोजित केलेले आहे जेणेकरुन शाळेतील अशा उपक्रमाची त्यांना माहिती होईल.

तुलसी अरोरा, सरोज श्रीनिवासन, आर. माधूरी - बेंगलोर.

## 'ओपन हाऊस' सत्र



### चंदाना

रायपूरपासून १४०कि.मी. अंतरावर असलेल्या चंदाना या छोट्याशा गावात २५ डिसेंबर २००७ रोजी 'ओपन हाऊस' सत्र पार पडले हे एक अतिदुर्गम असे खेडे असून तेथे एकही अभ्यासी नाही. ४० लोकांनी या सत्रामध्ये भाग घेतला व त्यापैकी ३९ लोकांनी साधना सुरू केली.

चंदाना या गावापासून २०कि.मी दूर असलेल्या बसाना खेड्यामध्ये २५ डिसेंबर २००७ रोजी एक छोटासा



कार्यक्रम घेण्यात आला ज्यामध्ये ८ लोक उपस्थित होते व त्यापैकी ६ लोकांनी साधनेस सुरवात केली.

### बिलासपूर केंद्र

१ डिसेंबर २००७ रोजी बिलासपूर केंद्रामध्ये 'ओपन हाऊस' आयोजित करण्यात आले. ११४ लोकांनी या मध्ये भाग घेतला व ६ लोकांनी साधना सुरू केली.

**राजम** विशाखापटणम जवळ: येथील स्थानिक विधिज्ञांसाठी ओपन हाऊस आयोजित केले होते ज्यामध्ये अंदाजे ४५ विधिज्ञांनी भाग घेतला.

**थुनी** विशाखापटणम जवळ: स्थानिक व्यापाऱ्यांसहित ६० लोकांनी येथील ओपन हाऊसमध्ये भाग घेतला.

**कुर्नुल** येथील मुलींच्या अभियांत्रिकी महाविद्यालयतील वसतिगृहात ओपन हाऊसचे आयोजन केले गेले. १८० पेक्षा जास्त मुलींनी या मध्ये भाग घेतला.

**मंदामारी** युवांसाठी आयोजित केलेल्या ओपन हाऊसमध्ये४३ युवकांनी भाग घेतला.

**करीमनगर** सिरसिला मंडलमधील रगडू या खेड्यात 'ओपन हाऊस' घेतले गेले. यामध्ये ५५ लोकांनी भाग घेतला.

**गोदावरीखणी** येथील स्थानिक शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या ओपन हाऊस मध्ये अंदाजे २० शिक्षकांनी भाग घेतला.

**अनंतपूर** संघमित्र पिक्नीक सेंटर येथे पब्लिक मिटींगचे आयोजन केले गेले, २० पेक्षा जास्त लोक त्यात सहभागी झाले.

## डॉक्टर स्वयंसेवकांसाठी विनंती (फक्त ॲलोपॅथी)

### फ्री मेडिकल सेंटर, बाबूजी मेमोरियल आश्रम, मणपक्कम, चेन्नई.



१९९९ पासून कार्यरत असलेले फ्री मेडिकल सेंटर १४ जानेवारी २००५ पासून नवीन प्रशासकीय इमारतीमधील प्रशस्त जागेत स्थलांतरित करण्यात आले, तेव्हापासून आपण फक्त आपल्या अभ्यासीनांच नव्हे तर मणपक्कमच्या आसपासच्या इच्छुक लोकांना देखील वैद्यकीय सुविधा पुरवित आहोत. दररोज १०० रुग्णांना तपासले जाते.

या फ्री मेडिकल सेंटरसाठी स्वयंसेवकांची बारमाही गरज आहे. त्यासाठी एक कार्यक्रम घेण्यात येणार आहे ज्यामध्ये फ्री मेडिकल सेंटरच्या कार्यप्रणालीची सहभागींना ओळख करुन देण्यात येईल, जेणेकरुन पुढे चालून ते त्यांच्या केंद्रांमध्ये हा उपक्रम राबवू शकतील. यामधील अडचणी दूर करण्यासाठी आम्ही एक उपक्रम ठरविला आहे ज्याच्या अंतर्गत त्यांनी कमीतकमी १५ दिवस व जास्तीत जास्त १ महिना येथे येऊन त्यांची वैद्यकीय सेवा प्रदान करावी.

### स्वयंसेवकांसाठी खालील गोष्टी आवश्यक आहेत :

१. तुम्ही सहजमार्गाचा अभ्यास किमान दोन वर्षे केलेला असावा.
२. तुमची आश्रमात राहण्याची व प्रवास खर्च स्वत:च करण्याची तयारी हवी.
३. प्रत्येक महिन्याचे दोन भाग करून इच्छुक सहभागींनी त्यांच्या सोयीने निवड करावयाची आहे त्यासोबत स्वत:ची माहिती ज्यामध्ये – नाव, पत्ता, पात्रता, संपर्कासाठी माहिती, ई–मेल आय डी व व्यावसायिक अनुभव इ. गोष्टींचा अंतर्भाव असावा.
४. तुमच्या येथील वास्तव्यात तुम्हाला आश्रम व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाखाली काम करावे लागेल व फ्री मेडिकल सेंटर मध्येच स्वयंसेवक म्हणून कार्य करावे लागेल.
५. तुम्ही महिन्याच्या कोणत्या सत्रात, म्हणजे पहिल्या पंधरवड्यात, दुसऱ्या की संपूर्ण महिन्यात याचा अर्जात तारीखवार उल्लेख करावा.

हा उपक्रम १ एप्रिल २००८ पासून सुरू करण्याचा विचार आहे. अर्ज, काही शंका व इतर गोष्टींसाठी खालील पत्यावर संपर्क साधावा.

डॉ. यु. रविंद्रन, संयोजक, फ्री मेडिकल सेंटर,
बाबूजी मेमोरियल आश्रम, मणपक्कम, चेन्नई–११६
फोन. 42171111 / 9382877974 (मो.)
ई–मेल– druravindran@gmail.com

"काम हे कधी ही दिले जात नाही. ते घेतले जाते यावर माझा विश्वास आहे. कामाच्या रहस्यांपैकी हे एक रहस्य आहे. एखाद्याला बोलावून काम देताना मी गुरुदेवांना कधीही पाहिले नाही परंतु जेव्हा केव्हा एखाद्याने काही काम करण्याची तयारी दाखविली तेव्हा माझ्या गुरुदेवांनी त्याला काम दिले व ते काम करण्याची शक्ती पण दिली आणि आणखी सेवा करण्यामध्ये जर त्याने रूची दाखविली तर आणखी जास्त महत्वाची कामे त्याला देण्यात आली.

मी पुनरुच्चार करतो की किमान अध्यात्मक्षेत्रातील कामाच्या मागचे तरी हे एक रहस्य आहेच !"

पा. राजगोपालाचारी
*Spiritual Flame, The Spider's Web, Vol. 2, p. 341.*

## वसंत उत्सव

परमपूज्य लालाजी महाराजांचा जन्मदिवस देशातील सर्व केंद्रे आणि उपकेंद्रमाध्ये अत्यंत भावभक्ती, प्रेम आणि श्रध्दायुक्त अंःतकरणाने साजरा केला गेला. बहुतेक राज्यांमध्ये, ओरिसाप्रमाणेच सर्व अभ्यासींनी एकाच ठिकाणी जन्मदिवस साजरा केला. त्याचप्रमाणे देशातील मोठ्या राज्यांत, विविध जिल्ह्यातील अभ्यासींनी एकत्र येऊन उत्सव साजरा केला.

या उत्सवांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे सकाळी आणि संध्याकाळचे सत्संग होते. काहीजण लालाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर बोलले, 'ही, द हुक्का ॲन्ड आय' चे प्रसारण आणि भजने अशा विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उत्सवानंतरचा पुढचा दिवस रविवार असल्याने, बऱ्याच ठिकाणी उत्सव पुढच्या दिवसापर्यंत घेण्यात आला.

उत्तरप्रदेशातील गोल गोकनाथ येथील आश्रमातील स्वयंपाक कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. उत्सवापाठोपाठ दोन दिवसांत बेसिक अभ्यासी ट्रेनिंग प्रोग्राम घेण्यात आला. यासाठी ४२ केंद्रातून सुमारे ४०० अभ्यासी उपस्थित होते.या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्यांमध्ये सौहार्दपूर्ण आणि सकारात्मक प्रतिक्रिया दिसून आल्या.

इंदौर केंद्राने वसंत उत्सवासाठी महु, देवास, नर्मदानगर, सनवेर, धार आणि मंडू या उपकेंद्राचे यजमानपद भूषविले. सुमारे ५०० बंधू आणि भगिनी सत्संगाला उपस्थित होते. चहापानानंतर केंद्रातील लहान मुलांनी मीराबाईंच्या जीवनावर आधारित संगीतनाट्याचे सादरीकरण केले.

या शुभ दिनी, उत्सवांत सहभागी होणाऱ्या विविध केंद्रातील अभ्यासींना अगदी वेगळा वाटला, जणू काही ते सर्व दैवी छत्राखाली होते. उत्सवाचा निरोप घेताना आपल्या प्रिय गुरूदेवांबद्दल कृतज्ञतेची भावना त्यांच्या ह्रदयात उपस्थित होती.

विकल्प, शेखर रॉय, प्रभात कुमार.

## ध्यानकक्ष – पैठण केंद्र

१ फेब्रुवारी २००८ हा पैठण केंद्राच्या विकासातला अत्यंत महत्त्वाचा दिवस होता. या रोजी येथील एका अभ्यासी बंधूंच्या निवासस्थानी ध्यान कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.



महाराष्ट्रातील औरंगाबादच्या दक्षिणेकडे ५६ कि.मी. अंतरावर गोदावरीच्या तीरावर वसलेले हे छोटे गाव आहे. पैठण हे केवळ ऐतिहासिक स्थान नसून याला अनेक संतमंडळींची कृपा लाभली आहे.अनेक शतकांपूर्वी येथे प्रसिद्ध संतकवी एकनाथ यांचे वास्तव्य होते, आणि तसेच ही संत भानुदास आणि मुक्तेश्वर यांची जन्मभूमीदेखील आहे.

पैठणपासून सर्वात जवळचे रेल्वेस्थानक आणि विमानतळ औरंगाबादला आहे. औरंगाबादहून पैठणला रस्त्यानेसुद्धा जाता येते. शहराच्या मध्यवर्ती केंद्रापासून ध्यानमंडप हे १ कि.मी. अंतरावर आहे.या ध्यानकक्षाची क्षमता ८० अभ्यासींएवढी आहे. महाराष्ट्राचे झोनल इनचार्ज सुभाष वैद्य यांनी येथे पहिला सत्संग घेतला. सत्संगानंतरचे त्यांचे वक्तव्य केंद्राच्या विकासातील अभ्यासीची भुमिका या विषयावर होते.

भविष्यात या केंद्रामध्ये एक 'सहज नगर' उभारेल अशी इच्छा सर्वांनी व्यक्त केली.

## सेवाश्रम – नवी दिल्ली येथे युवांसाठी कार्यशाळा

नवी दिल्ली केंद्राच्या युवांसाठी १२ जानेवारी रोजी (इनर अवेकनींग) अंत:जागृती या विषयावर एक कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या व्यासपीठावरून 'मानवी जीवनात अध्यात्माची आवश्यकता' व 'अंत:जागृती ही समर्थ सदगुरूंच्या द्वारेच केली जाते' या विषयावर भाषणे दिली गेली. त्याच बरोबर 'सदगुरू आपल्या ह्रदयात परिवर्तन घडवून शांतपणे कशी क्रांती घडावून आणतात' तसेच 'चारित्र्य विकासात आमची मुख्य जवाबदारी' या विषयांवर ही चर्चा झाली.

अभ्यासींचे गट पाडण्यात आले होते. प्रत्येक गटाने त्यांना दिलेल्या विषयावर आपले विचार मांडले. प्रश्नोत्तराचे सत्र देखील आयोजित केले होते व त्यानंतर (ट्रेझर हंट) खजीन्याचा शोध हा कार्यक्रम घेण्यात आला. सहजमार्गावरील (क्वीज) प्रश्नमंजुषा हे या कार्यशाळेतील सर्वांनी आनंदानी भाग घेतलेले आणखी एक सत्र ठरले. हा उपक्रम सर्वांचा उत्साह वाढविणारा तर ठरलाच परंतु या मधून दिल्ली येथील युवकांना शिकण्याचा चांगला अनुभव देखील मिळाला.

विजया विठ्ठल, नवी दिल्ली.

## सेंटर्स ऑफ लाईट – बाबूजी मेमोरियल आश्रम, कोलकता.

“ आपली मिशन सर्वदिशांनी पंख फैलावत आहे आणि हा आश्रम म्हणजे आणखी एक मानाचा तुरा आहे... शिल्पशास्त्रीय सौंदर्याचा नमुना असलेल्या उंच व भव्य इमारतींच्यामध्ये जर वास्तविक जीवनाचा अभाव असेल तर आतून पोकळ असलेल्या विटांसारख्याच त्या दिखाऊ राहतील. हे एक असे ठिकाण बनविले पाहिजे जेथे आम्हाला ‘आश्रय’ मिळेल, जेथे उच्चतमाशी अनुसंधान साधण्याच्या प्रयत्नात आत्म्याला शांती मिळेल.”



बाबूजी मेमोरियल आश्रम कोलकताच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केलेले हे शब्द आहेत बंधू श्री अजय भट्टर यांचे. हा आश्रम जितका सिमेंट व विटांमधून बांधला गेला तितकाच तो असंख्य अभ्यासींच्या प्रेम व भक्तीमधून बांधला गेला आहे. या आश्रमाची कोनशिला दि. १७ मार्च २००२ रोजी प्रिय गुरुदेवांच्या हस्ते बसविण्यात आली होती, तरीही बांधकामाची सुरवात १५ नोव्हेंबरला होऊन ते विक्रमी वेळेत पूर्ण करून त्याचे उद्घाटन २५ डिसेंबर २००३ला करण्यात आले.

हा आश्रम शहाराच्या पूर्व भागात रुबी हॉस्पिटलच्या मागच्या बाजूस स्थित आहे. हा आश्रम विमातळापासून १८ कि.मी व रेल्वेस्थानकापासून २१ कि.मी अंतरावर आहे.

एकूण बांधकाम झालेले क्षेत्र ४८००० चौरस फूट असून ते दोन इमारतींमध्ये विभागलेले आहे. या मध्ये तळमजल्यावर प्रशासकीय खोल्या, स्वयंपाकगृह व





त्याच्यासमोर भोजनकक्ष असून इतर मजल्यांवर अभ्यासींच्या खोल्या आहेत. त्याचबरोबर सुंदर असे मास्टर कॉटेज व भव्य ध्यानकक्ष आहे. ध्यानकक्षाच्या खालच्या बाजूस अभ्यासींना राहण्यासाठी डॉर्मेटरीज असून बंधू भगिनींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत. इतर आश्रमांच्या तुलनेत कोलकता आश्रमाचे एकूण क्षेत्र फार मोठे नसले तरी योग्य प्रकारे केलेल्या आखणीमुळे सर्व इमारतींच्या सभोवताली हिरवळ(लॉन) तयार करण्यात आलेली आहे व या हिरवळीचा काही भाग मुलांसाठी घसरगुंडी, झोका, तसेच बास्केटबॉलसाठीचे क्रिडासंकूल झालेले आहे!
ध्यानकक्षाला एक पायऱ्यांवरून व दुसरे रॅम्पवरून (उतार) असे दोन प्रवेशव्दार आहेत. मिशनच्या बोधचिन्हामधील सर्व प्रकारच्या अडथळ्यांच्यामधून, पहाडातून सर्वात उंच शिखराकडे जाणाऱ्या सहजमार्ग पथासारखाच प्रत्येक पायरीगणिक सर्वात वरच्या भागापर्यंत पोहचविणारा हा मार्ग आहे.

मास्टर कॉटेज देखील फारच विचारपूर्वक करण्यात आले आहे, ज्याअंतर्गत पहिल्या मजल्यावरील गुरुदेवांच्या शयनकक्षाला लागूनच एक मोठा वऱ्हांडा सोडण्यात आला आहे. या वऱ्हांडामध्ये गुरुदेव बऱ्याच वेळा येऊन बसतात व मास्टर कॉटेजच्या खालच्या भागात व समोरच्या भोजनकक्षामध्ये गुरुदेवांची वाट बघत असलेल्या अभ्यासी समूहाशी बातचित करतात तेव्हा अभ्यासींच्या आनंदाला पारावार उरत नाही.

ध्यानकक्षाच्या बाजूच्या हिरवळीमध्ये नुकताच पू. बाबूजी महाराजांचा संगमरवरी पुतळा बसविण्यात आला आहे. ज्या महान गुरुदेवांच्या स्मरणार्थ हा आश्रम प्रिय गुरुदेवांनी उभारला आहे त्यांना ही एक सुयोग्य अशी आदरांजली आहे.

पू. गुरुदेवांच्या शब्दात,“ हा कोलकता येथील आश्रम म्हणजे या विशाल कार्याचा (मिशनच्या) दृष्य व ठोस पुरावा आहे... अशा प्रकाश केंद्रांमधून आपली मिशन संपूर्ण पृथ्वीतलावर प्रकाशमान होत राहील ज्याच्या वलयाला झाकून ठेवता येणार नाही.”

**To subscribe to this Newsletter please visit http://www.srcm.org/centers/as/in/newsletter/index.jsp**
**For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**

© 2008 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved.
“Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.
This message may be edited for content and is intended exclusively for the members of SRCM.